# पाचवे प्रकरण

## उपसंहार

## पाचवे प्रकरण

# उपसंहार

मराठ्यांच्या इतिहासाला गंभीर वळण देणारे पानिपतचे युध्द हा भाऊसाहेबांची बखर आणि पाणिपतची बखर या दोन्ही बखरीचा मुख्य विषय आहे. या दोनही बखरींचा तपशीलवार अभ्यास केल्यानंतर त्यासंबंधीचे निष्कर्ष काढता येतात. विशेष म्हणजे दोनही बखरी आपल्या ठिकाणी उत्तमच आहेत. दोनही बखरींमध्ये बखरकाराचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबीत झालेले वाचकास दिसते. या दोन्ही बखरींचा विविध दृष्टिकोणातून मी अभ्यास केला. कथावस्तू, व्यक्तिचित्रे, भाषाशैली, संवादलेखन आणि रसपरिपोष या पाच घटकांच्या माध्यमातून दोनही बखरींवर इथे प्रकाश टाकण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यातून काही निरीक्षणे मांडता येतात. ती पुढीलप्रमाणे-

## निष्कर्ष

१.अभिव्यक्ती-

ऐतिहासिक प्रसिध्द पानिपतचे युध्द हा भाऊसाहेबांची बखर आणि पाणिपतची बखर या दोन्ही बखरींचा मुख्य वर्ण्य विषय आहे. असे असले तरी बखरकारांच्या व्यक्तिमत्वानुसार दोन्ही बखरींची अभिव्यक्ती भिन्न रंगी झाली आहे.

२.कथावस्तू-

कथावस्तूच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास 'भाऊसाहेबांची बखर'मधील कथानक विस्तृत आणि कसदार झाले आहे. उत्तर हिंदुस्थानातील कुंभेरीस मोर्चे-मारवाड प्रांतीच्या रामसिंग-बिजेसिंगमधील कलह-बुंदेलखंडच्या राणीने मागितलेली मदत-मलकाजमानी-व नजीबखान यांचे कारस्थान-नजीखान रोहिल्याचे रघुनाथराव, मल्हारराव, जनकोजी व दत्ताजी यांच्या तावडीतून निसटणे-नजीबखानचे कंदाहारच्या अबदुल अलीस पाचारण-दत्ताजींचा वध- ह्या घटना भाऊंच्या मोहिमेपूर्वीच्या आहेत. बखरीतील नऊ भागांपैकी जवळजवळ सात भाग ह्या

घटनांच्या वर्णनांनी व्यापले आहेत. पुढील दोन भाग भाऊसाहेबांच्या मोहिमेच्या वर्णनांनी सिध्द झाले आहेत. या उलट 'पाणिपतची बखर' मधील कथावस्तू भाऊसाहेब उत्तरेकडे मोहिमेस निघाले या घटनेपासूनच सुरू होते. 'भाऊसाहेबांची बखर' मध्ये भाऊसाहेबांनी माळवा प्रांतातच राहावे असे मल्हारराव कळवितात. तरीही भाऊसाहेब चमेलीपार येतात. तेव्हा मल्हारराव चिडून त्याचा जाब विचारतात. जनकोजी व मल्हारराव हे दोघेही नाराज होतात. पुढे ज्या कुतुबशहाने दत्ताजींचा वध केला तोच कुतुबशहा भाऊसाहेबांना जिवंत सापडतो. त्याचा शिरच्छेद केला जातो. त्यानंतर भाऊसाहेबांचा दुराणीशी झालेला सामना वर्णिला आहे. 'भाऊसाहेबांची बखर' मधील कथानक असे अनेक पदरी झाले आहे. हे कथानक गुंतागुंतीचे असले तरी बखरकाराच्या निवेदनकौशल्यामुळे ते सरळ आणि रसाळ उतरले आहे. उत्तर हिंदुस्थानातील इतिहासाचे एक एक प्रकरण या बखरीत बहारीचे झाले आहे.

'पाणिपतची बखर' मधील कथानक मुद्देसूद, आटोपशीर आणि धावते झालेले आहे. त्यामुळे या बखरीतील कथावस्तू बांधेसूद झाली आहे. तुलनात्मक दृष्ट्या 'भाऊसाहेबांची बखर' मधील कथावस्तू अधिक नाट्यमय आणि अधिक काव्यात्मक झाली आहे.

३.व्यक्तिदर्शन-

व्यक्तिदर्शनाचा विचार करता भाऊसाहेबांची बखर उजवी ठरते. भाऊसाहेब, मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, जनकोजी शिंदे, नजीबखान रोहिला, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे या अनेक व्यक्तींच्या व्यक्तिमत्वावर इथे बखरकाराने प्रकाश टाकल्याचे दिसते. त्या मानाने 'पाणिपतची बखर' मध्ये भाऊसाहेब आणि मल्हारराव होळकर या दोनच व्यक्तिमत्वांचे दर्शन घडते. दुसरे म्हणजे नजिबखान रोहिल्याने मराठ्यांच्यावर प्यादेमात कशी केली ते सविस्तरपणे 'भाऊसाहेबांची बखर' मध्ये लिहिले गेले आहे. नजीबखानाने मराठ्यांविरूध्दचा असंतोष एकत्र करून अबदालीला पाचारण केले आणि त्याच्याशी संधान बांधून त्याने मराठ्यांच्या फौजेवर पानिपतच्या रणसंग्रामात निर्णायक विजय मिळविला. त्या दृष्टीने भाऊसाहेबांच्या मराठी सैन्याविरूध्द पाताळयंत्रीपणा करून कट रचून कारस्थान करणारा मुत्सद्दी नजिबखान रोहिला ही व्यक्तिरेखा तसेच शूर मराठा सरदाराचीधैर्यशाली व पराक्रमी वीर ही प्रतिमा या बखरीत उठावदारपणे व्यक्त झाली आहे. त्या मानाने 'पाणिपतची बखर' व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने खूपच कमी पडते. अर्थात त्यात भाऊसाहेबांचे व्यक्तिदर्शन मात्र समृध्दपणे प्रगट झाले आहे. जयाजी शिंदे, जनकोजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे या शूर मराठा सरदारांची व्यक्तिचित्रे 'भाऊसाहेबांची बखर' मध्ये रंगतदार व उजळ झाली आहेत.

४.संवाद-

संवादलेखनाचा परामर्श घेता 'भाऊसाहेबांची बखर' मधील संवाद अधिक सहज सुंदर

झाले आहेत, असे स्पष्टपणे जाणवते. तानाजी खराडा सरदाराने दत्ताजी शिंदे यांना दुराणीची फौज आली. आपण आपले निशाण काढावे'' असे सुचवले. त्यावर दत्ताजी म्हणतात-''आप मेला जग बुडाले. आबरू जाते आणि वाचतो कोण? अजून निघावयाची काय बाकी राहिली आहे? सफेजंगी होऊन गेली. आता निशाण काढाल तर फौज पळू लागेल. मग म्याही पलावे? मग देशी तोंड मी दत्ताजीने काय म्हणोन दाखवावे?'' (भाऊसाहेबांची बखर-पृष्ठ ४४)

मागती नजीबखान व नबाब सुज्यातदौला एकत्र होऊन मसलद केली की, ''हा तर मनसोबा राहिला. आता एक करावे. क्रोड रूपयांचे लटके आशेस गोवून पाडावे. तो आबदुलआलीही येऊन पोहोचत आहे. दुराणी आलियावरी मराठे यास उठो न द्यावे. बसले जागी मारावे.'' म्हणोन या प्रकारे मसलत करून 'आज रूपयेची निशा देतो, उद्या निशा करतो.' म्हणोन आशा लाविली. -असे कितीतरी संवाद 'भाऊसाहेबांची बखर' मध्ये अंतर्भूत आहेत. त्यात स्वाभाविकता आहे आणि बोलीभाषेतील जिवंतपणा उतरला आहे.

'पाणिपतची बखर' मध्ये मल्हारजी होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, अंताजी माणकेश्वर इ. सरदार भाऊसाहेबांजवळ येऊन आपले मनोगत स्पष्ट शब्दात मांडतात. ''हेका केल्यामुळे दौलत बुडाली---तुम्ही सर्वांचा घात केला. आपल्या हाते सर्व वैभव बुडविले. ... आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून उद्याच्या लढाईत आम्ही सर्व प्राणांनिशी गेल्याने आपली स्वारी फत्ते होते की काय?'' अशा अर्थाचे हे बखरीतील मनोगत प्रदीर्घ झाले आहे. या मनोगतात वक्तृत्व आणि ठामपणा दिसून येतो. त्यावर भाऊसाहेब उत्तर देतात-''होणारास उपाय काय? कोणी आपण आपले अनिष्ट चिंतीत नाही....आता शरीर तृणप्राय मानून मर्दुमीचा हिय्या न सोडिता, समशेरीची शर्थ करून दाखवावी-.. उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मारता मारता कटून मरावे. या भूषणापरते दुसरे काय आहे?''-या त्यांच्या आवाहनात थोर सेनापतीचा उर्जस्वल आवेश आहे, जोश आहे. यापुढील भाऊसाहेब आणि विश्वासराव यांची करूण भाषणे दुःख या भावनेला आवाहन करणारी झाली आहेत. 'पाणिपतची बखर' या बखरीतील ही उपरोल्लेखित भाषणे व संभाषणे वाङ्मय गुण दृष्ट्या सकस व समृध्द उतरली आहेत.

याचबरोबर दुराणी भाऊसाहेबांकडे वकील पाठवून इशारा देतो-''तुम्ही आपले स्वारीचा खर्च दिल्लीपतीपासून घेऊन आपले स्वदेशास जावे....तुम्हासही बेकैदी चालल्यास इजा द्यावी, सबब आमच्या खावंदांनी आम्हास रूमशामहू बिदा करून पाठविले. तुमचा पिच्छा पुरवावा लागले.... जाजती उपद्रव मुलुखास व बादशहास द्यावयाची गरज नाही....जिंद वाढविल्यास कामास येणार नाही. त्यात तुम्ही माकूल आहां.''-हा दुराणीचा इशारा वक्तृत्वसंपन्न व नाट्यपूर्ण आहे. या इशाऱ्याला भाऊसाहेबांनी सडेतोड व ठणठणीत उत्तर दिले आहे. ''हिंदुपत बादशाही येथील बंदोबस्त करणे तो आम्हीच करू.... आता तुम्ही आमचे मसलतीस अडथळा करणार

कोण? रूमशामची खबर आम्ही घेणार, येथे तुमचा मजकूर कोठे? तुम्ही आल्यामार्गे अटक उतरून जावे. भाईचारा राखावयाचा असल्यास लौकर फौजेसुध्दा माघारे जावे...तुमचे हुकमाची तमा धरीत नाही. लढाई करावी हाच आमचा निश्चय'' ही संभाषणे रोखठोक व नोकझोक उतरली आहेत. त्या दृष्टीने ही मोठी संभाषणे हे ' पाणिपतची बखर' चे कलासंपन्न वैशिष्ट्य ठरते.

५.भाषाशैली-

रघुनाथ यादव विरचित 'पाणिपतची बखर' मधील भाषाशैली ओघवती व सकस आहे. पेशवेकालीन मराठी भाषेचा उत्तम नमुना दोन्ही बखरीत पहावयास मिळतो. दोनही बखरीतील भाषासौंदर्य लक्षणीय आहे. दोन्ही बखरीतील भाषाशैली म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, सुभाषिते यांनी मंडित झाली आहे. 'पाणिपतची बखर'मधील युध्दवर्णने वैशिष्ठ्यपूर्ण व दृश्यात्मक झाली आहेत. 'भाऊसाहेबांची बखर' मधील स्थलवर्णनेही चांगली उतरली आहेत. ''तेथून दिली इंद्रपस्त कचे चालीस कोस. हस्तनापुरी काही वस्ती नाही. साक्षात मात्र जुनी पांढरवस्ती उगीच दिसती आहे. तिथे टेकाडे मात्र आहे. तेथे तीर्थाचा कूप व वटवृक्ष मात्र आहेत.''-अशा तऱ्हेची अनेक स्थलवर्णने दृश्यरूप झाली आहेत. तसेच या बखरीत काव्याची अवतरणे दोन ठिकाणी आली आहेत. उर्दू, अरबी, फार्सी भाषांतील शब्दांचा भरपूर भरणा असलेली मराठमोळी भाषाशैली ह्या दोन्ही बखरींमधून आपणास पहावयास मिळते. ही वैशिष्ठ्यपूर्ण भाषाशैली दोन्ही बखरींचे बलस्थान आहे.

६.रसपरिपोष-

दोनही बखरीतील रसपरिपोष नेटका आणि नेमका झाला आहे. रणांगणावर झालेल्या लढायांची वर्णने वीररसयुक्त झाली आहेत. स्त्रियांची शोकपूर्ण संभाषणे, करूणरसपूर्ण झाली आहेत. बिभत्स रस, रौद्ररस, वत्सल रस यांच्याही चांगल्या छटा बखरींमधून अवतरल्या आहेत. दोनही बखरींमधून आलेली युध्दाची वर्णने दृश्यात्मक झाली आहेत. वाचकाच्या डोळ्यांपुढे यथोचित दृश्य उभे करण्याचे सामर्थ्य या रसपरिपोषामधून झाले आहे. बखरकारांनी आपापल्या बखरीत जी प्रसंगवर्णने केली आहेत त्यामधून ही रसनिर्मिती झाली आहेत. यातील घटना आणि प्रसंग वाचकांच्या मन:चक्षुसमोर यथातथ्य उभ्या राहतात. हेच या दोन्ही बखरींचे वाङ्मयीन यश आहे.

७.बखरकाराचे व्यक्तिमत्व -

'भाऊसाहेबांची बखर' कृष्णाजी शामराव यांनी लिहिली आहे तर 'पाणिपतीची बखर' रघुनाथ यादव यांनी लिहिली आहे. या बखरकारांचे व्यक्तिमत्व बखरीतून प्रगट झाले आहे.

'भाऊसाहेबांची बखर' चा बखरकार पंडित आणि प्रतिभावान आहे. त्याची भाषाशैली प्रौढ आणि प्रवाही आहे. तो अभ्यासू आहे. उत्तर हिंदुस्थानातल्या तत्कालीन राजकारणाचे बारीकसारीक धागेदोरे त्याला ज्ञात होते. तिकडच्या सर्व घडामोडींमधील त्याचे सूक्ष्म निरीक्षण लक्षणीय आहे. व्यक्तीच्या स्वभावांचा तो जाणकार आहे. तिकडच्या तीर्थक्षेत्रांचा पूर्वेतिहास त्याने नोंदवला आहे. त्यावरून तो बहुश्रुत आहे, हे लक्षात येते. तिकडची अनेक गावे-ठिकाणे-पक्ष-संस्थाने राजे,युध्द, व्यक्ती-त्यांची मैत्री-त्यांचे शत्रूत्व या सर्व बाबींची त्याला इत्थंभूत माहिती आहे. नजीबखान प्याद्याचा फर्जी कसा झाला आणि त्याने प्यादेमात कशी केली या सूत्रात सबंध बखर गोवणारा हा बखरकार वाङ्मयीन गुणांचा जाणकार आहे. मराठीसह उर्दू, संस्कृत, हिंदी या भाषांचा तो जाणकार आहे.

'पाणिपतची बखर' लिहिणारा रघुनाथ यादव यशस्वी बखरकार आहे. त्याने भाऊसाहेबांची उत्तरेतील मोहिम आणि पानिपतवर त्यांना आलेले अपयश एवढ्याच बाबींवर भर देऊन बखर लिहिली आहे. त्याचा तत्कालीन राजकारणाचा अभ्यास चांगला आहे. त्याला मानवी स्वभावाचे ज्ञान चांगले आहे. पण हा बखरकार कृष्णाजी शामराव एवढा बहुश्रुत नाही.

थोडक्यात भाऊसाहेबांची बखर म्हणजे गर्द वृक्षराजी,मध्ये सुंदर उद्यान आणि त्या उद्यानात एक सुंदर शिवालय आणि त्या सुंदर शिवालयात उत्तम शिवमूर्ती आहे. तर पाणिपतची बखर म्हणजे प्रत्यक्ष सुंदर शिवमूर्तीच आहे, असे म्हणता येईल.